

# गावगाडा

प्रा.एल.जे.गवळी

Scanned with OKEN Scanner



# खास
# साक्षरता
# अभियानासाठी...

Scanned with OKEN Scanner

प्रथमावृत्ती २००१

★ लेखक

प्रा. एल. जे. गवळी

भाडणे, ता. साक्री जि. धुळे ☎ ४०८६८

★ प्रकाशक

चंदेल प्रकाशन

व्दारा–युवराजसिंह चंदेल

'इंदिरा निवास' भाडणे रोड, साक्री जि. धुळे ☎ ४०५२६

★ मुद्रक

घटिका ऑफसेट प्रिंटर्स

व्दारा–रमेश कस्तुर बागुल, सटाणा रोड, पिंपळनेर ☎ २३८८१

★ टाईपसेटिंग

आप्तेष्ट कॉम्प्युटर्स

व्दारा– विनय पोपटराव कोतकर. भोई गल्ली, पिंपळनेर ☎ २३६२४

★ मुखपृष्ठ

जगदिश चिंधु पवार(कलाशिक्षक)

आदर्श विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, निजामपूर

★ मूल्य – ४० रुपये

(केवळ खाजगीवितरणासाठी )

© सर्वहक्क सौ. रेखा एल. गवळी

मुद्दानी सुचना

आगाऊ परवानगी लेवाशिवाय या नाटकना प्रयोग करानां नई.

संपर्क पत्ता – श्री. प्रा. एल. जे. गवळी

मु. पो. भाडणे ता. साक्री जि. धुळे

घरना ☎ ४०८६८ (माळीवाडा)





# अर्पण

आडी आडचणमा साथ दिधी
मदतना हात दिधा
ज्यास्नी माले आकार दिधा
आणि माले घडायं
त्या मना तिर्थस्वरुप आदरणीय
श्रीयूत प्राचार्य नानासाहेब जी. आर. भावसार
व सौ. आर. जी. भावसार
या माय बापस्ले
हावू 'गावगाडा' सादर समर्पण.

**- प्रा. एल. जे. गवळी**



# प्रस्तावना

'गावगाडा' नाटक आहे एका माळी कुटुंबातील गावगाड्यात जन्म घेवून काळ्या मातीशी इमान राखत; कधी म्हातान्या कोतान्या बैलांची गाडी हाकलत, कधी भूऱ्या कुत्र्याशी गाणी म्हणत; कधी कांदा भाकरी खात; कधी औत हाकलत; कधी मेथी कोथिंबीरीला पाणि भरत; कधी जांभळं खात; कधी आई दळत असतांना ओव्या ऐकत; कधी पिकावरच्या चिमण्या उडवत; कधी शिळ वाजवत गाणी म्हणत; कधी भाजी विकत; कधी अभ्यास करत करत शिकत शिकत एम. ए. होवून न्यु इंग्लीश स्कुल साक्री सारख्या संस्थेत दोन वर्ष शिपाईची नोकरी करुन प्राध्यापक होणाऱ्या तरुणाचे.

'गावगाडा' नाटक लिहीण्याचा त्यांचा हेतू नाटक पाहून व वाचून लक्षात येतो तो हाच की आज विज्ञान युगामध्ये वावरत असतांना प्रत्येक समाज अनेक अनिष्ट रुढींनी ग्रासलेला आहे. मांजर आडवी गेली म्हणजे सात पावले मागे सरकणारा समाज. टिटवी ओरडते म्हणून काहितरी वाईट घडेल असा म्हणणारा समाज. कुत्रे भुंकतात म्हणून अशुभ घडेल असे म्हणणारा समाज. मांजर तोंड धुते म्हणून पाहुणे येतील असे म्हणणारा समाज. तवा हसतो आहे म्हणून कोणीतरी येईल असे म्हणणारा समाज. अशा अनेक अपसमजुतींनी माणसाला जखडुन ठेवले आहे. शिवाय ढोंगी साधूंच्या अनेक कावेबाजपणाला माणूस फसत आहे. फसवले जाणाऱ्यात निरक्षर लोकांची संख्या जास्त आहे. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या असंख्य बंधुची पावले दारुसारख्या अमली पेयांकडे वळालेली आहेत. असंख्य माता बघिनी व्यसनी नवऱ्यांना वैतागून स्वत:ची प्राणज्योत स्वत:च मालवून घेत आहेत. काही तरुणांच्या वाईट संगतीमुळे काही तरुण एडस सारख्या महाभयानक आजारामुळे मृत्युला आळवित आहेत. या एकूणच निरक्षरता – अंद्धश्रद्धा – व्यसनाधिणता या मानवाला अधोगतिकडे नेणाऱ्या घटकांवरती समर्थपणे प्रकाश टाकण्याचे काम 'गावगाडा' या नाटकामुळे होणार आहे. आणि या सर्वांचे समुळ उच्चाटन करायचे असेल तर निरक्षर – अडाणी – अंधश्रद्धाळू झोपलेल्या समाजाला शिक्षणाच्या माध्यमाने जागे करणे हेच या नाटकाचे मध्यसूत्र आहे.

'' अक्षर कळेल; संकट टळेल, साक्षर जनता; भूषण भारता, ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा.'' या विचाराने प्रेरीत झालेला गावगाडाचा हा रथ पिंपळनेरच्या परीसरातील ज्या ज्या गावांमध्ये गेला त्या त्या गावांमध्ये लख्खपणे प्रकाश टाकून आला आहे. हा गावगाडा याही पुढे ज्या ज्या गावांमध्ये सादर होईल. जेथे जेथे जाईल तेथे तेथे प्रत्येक वेळी तो समर्थ पणे प्रकाशच टाकणार आहे. याचा मला आत्मविश्वास आहे.

' गावगाडा ' नाटकाची भाषा अहिराणी आहे. हे 'गावगाडा' नाटकाचे लक्षणीय वैशिष्ट्ये आहे. कारण सामान्य लोकांना जागे करण्यासाठी हेंगडा – वाकडा – तिकडा कसाही ढोल बढवावा लागतो . तेथे कर्णमधुर संगिताची किंवा वाद्यांची आवश्यकता नाही. या विचाराचे श्रेय प्रा. एल. जे. गवळी यांच्या गावराणी लेखणीला व गावगाड्याच्या सारथी कलाकारांकडेच जाते. जाता जाता गावगाडाचे लेखक प्रा. एल. जे. गवळी व माझ्या विद्यार्थी कलाकारांना सुयश चिंतीतो व हि प्रस्तावना संपवितो.

*प्राचार्य जी. आर. भावसार*
कर्म.आ. मा. पाटील वरीष्ठ महाविद्यालय
पिंपळनेर ता. साक्री जि. धुळे

Scanned with OKEN Scanner

'' अक्षर कळेल; संकट टळेल, साक्षर जनता; भूषण भारता, ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा.'' या विचाराने प्रेरीत झालेला गावगाडाचा हा रथ पिंपळनेरच्या परीसरातील ज्या ज्या गावांमध्ये गेला त्या त्या गावांमध्ये लख्खपणे प्रकाश टाकून आला आहे. हा गावगाडा याही पुढे ज्या ज्या गावांमध्ये सादर होईल. जेथे जेथे जाईल तेथे तेथे प्रत्येक वेळी तो समर्थ पणे प्रकाशच टाकणार आहे. याचा मला आत्मविश्वास आहे.

' गावगाडा ' नाटकाची भाषा अहिराणी आहे. हे 'गावगाडा' नाटकाचे लक्षणीय वैशिष्ट्ये आहे. कारण सामान्य लोकांना जागे करण्यासाठी हेंगडा – वाकडा – तिकडा कसाही ढोल बढवावा लागतो . तेथे कर्णमधुर संगिताची किंवा वाद्यांची आवश्यकता नाही. या विचाराचे श्रेय प्रा. एल. जे. गवळी यांच्या गावराणी लेखणीला व गावगाड्याच्या सारथी कलाकारांकडेच जाते. जाता जाता गावगाडाचे लेखक प्रा. एल. जे. गवळी व माझ्या विद्यार्थी कलाकारांना सुयश चिंतीतो व हि प्रस्तावना संपवितो.

**प्राचार्य जी. आर. भावसार**
कर्म.आ. मा. पाटील वरीष्ठ महाविद्यालय
पिंपळनेर ता. साक्री जि. धुळे

# मनोगत

दखा गड्यासवन ! मी धोतर संस्कृतीमा जन्मले वनू. मया खयामा काम कय. बापना धंदा भाजीपाला ईकाना; म्हणीन बराच दावले भाजी पाला ईका – बारा धरत – औत हाकलत शिक्सन कयं. फाटेल परिस्थीती मुये आडीआडचण मा श्री. जी. आर. भावसार सरस्नी माले मदत ना हात दिधा. तीर्थस्वरुप रंजणाबाई जी. भावसार हाई माऊलीनी माले साखर दिधी. आणि भाकर भी दिधी. या माय बापस्ले मी मरस्तव मना दिलमाच ठेवसू. गावगाडा नाटकले मना गुरु एल. जी. आबा, जे.डी. जगदाळे; म.सु.पगारे, मा. श्रीयूत काकासाहेब हरिलाल अमृत भावसार, श्री. रामचंद्र महाजन, – नंदाणे, श्री. संजय पांडूरंग महाजन, –दोंडाईचा, श्री. छोटूसिंग चव्हाण, मा. बापूसाहेब श्री. त्र्यं. शं. देशमुख, श्रीयूत पी. बी. सोनवणे, – कुसूंबे, श्रीयूत पी. टी. महाजन, – पाचोरा, श्रीयूत संजय घरटे, – सामोडे, श्रीयूत के. एस. महाजन, – जामनेर, श्रीयूत पंडित डिगंबर महाजन, – कापडणे, श्रीयूत सुनिल नवल अेंडाईत, –कापडणे, श्रीयूत पी.बी. महाजन, – धुळे, श्रीयूत भगवान डिगंबर महाजन, –खेडे, श्रीयूत रामचंद्र भिका सोनवणे, –खेडे, श्रीयूत सहादू भिका महाजन, – खेडे, श्रीयूत के. झेड. महाजन, –शिरपूर, मना जोडिदार एस.बी. पाटील, प्रा.राऊत के. आर., प्रा. डी. डी. नेरकर, श्री. सुभाष जगताप, डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. स्मिता जोशी, अमृतकर सर, श्री. बी. आर. भावसार, श्री. दादाभाऊ नांद्रे, प्रा. अजित सोनवणे, प्रा. नितीन सोनवणे, प्रा. संजय तोरवणे श्री. रिंगनाथ भावसार, ग्रंथपाल श्री. एल. जी. जाधव, वीसपुते आबा, श्री. दिलीप चंद्रात्रे, मालतीबाई चंद्रात्रे, श्री. टी. आर. महाजन, पाचोरा, शिरसाठ भाऊ , रामभाऊ , एस. टी. सोनवणे, आर. एम. जोशी, एस. व्ही. जोशी, कोठावदे सर, सावळे सर, घरटे सर, वसावे सर, मोरे सर, आहिरे सर आणि कुवर भाऊसाहेब आशी आख्खी प्राध्यापक व क्लार्क मंडळी; शिपाई मंडळीनं सहकार्य लाभनं याना माले अभिमान से. तशीच दुसरी मुद्दानी गोट म्हंजे मनी घरनी लक्ष्मी म्हंजे मनी बायको सौ. रेखा एल. गवळी हाई 'हम दो हमारे दो' ना जमानामा आजबी पंधरा लोकेस्ना डखारामा न्हाईस्नीबी आनंदमा

से यानाबी माले खूप खूप अभिमानसे. मना गावगाडाले तिनं दांडग सहकार्य लाभनं हाई मी नमुद करालेच पाहिजे.

शिवाय बिरारीस समाधान अरविंद–पगारे रविकुमार बळवंत–पाटील जगदिश मधुकर– माळी कृष्णा वंजी – पगारे योगेंद्र गोकुळ–पाटील विजयराज युवराज – शिंपी प्रविण दिनकर– दशपुते हेमराज सोमनाथ बिरारीस रामकृष्ण पंडितराव– कोतकर निलेश गणेश–बागुल भरत कांतीलाल– जाधव संतोष सुरेश– देवरे योगेश अशोक–दाभाडे रविंद्र त्र्यंबक– खैरनार विश्वास नामदेवराव– देवरे शशिकांत विद्या काळे आश्या दर्दी कलाकार विद्यार्थीस्नी गावगाडा नाटकना पिंपळनेर पंचक्रोशीमा २२ प्रयोग दनकाईनी सादर कयात. अंधश्रद्धा–व्यसनाधिनता–निरक्षरता या घटकेसवर प्रकाश टाका. जिरापूर–देशशिरवाडे–पानथळ–बल्हाणे आशा अनेक गावस्मा आम्ही हाई गावगाडं लई गवूत. प्रत्येक गावना लोकस्नी आम्हनी तोंडभरी स्तुती कई. कर्म आ. मा. पाटील सिनीयर कॉलेजन नाव बढाय. याना माले खुप खुप आनंद व्हस. माले एकच वाईट वाटस आपला भारत देशना लोकेआपली धोतर संस्कृतीले इसरीस्नी हाय... हॅलो... मम्मी... डॅडी...पप्पा...यान मांगे पई न्हायनात. पण या लोकेस्ले मन एकच सांगणं से– आरे मीठ शिवाय चव नही. आणि माय शिवाय माया नही. पण लोके नेमका मायले इसरीन्हायनात. आणि बायकोले डोकावर धरीन्हायनात. हावू नतद्रष्टपणासे. बोलना मांगे बोलनं येस.......

..... मायनि रांधा घाटा, कपायले बांधा पाटा

बायकोनि रांधा घाटा, दोन्ही दोन्ही हाते चाटा......

हाई दुन्यानी रीत से. याना समतोल राखाले पाहीजे. बस्स मी आठे थांबस.

**प्रा. एल. जे. गवळी**

ज्यानी घर कानबाई पावनी ते त्यानी घर काय काय परमये
ज्यानी घर कानबाई पावनी ते त्यानी घर गुलाल परमये
आकाशवरण्या तिन्ही चांदण्या चवथी चांदणी झिरमये
ज्यानी घर कानबाई पावनी ते त्यानी घर अबीर परमये
ज्यानी घर कानबाई पावनी ते त्यानी घर काय काय परमये
ज्यानी घर कानबाई पावनी ते त्यानी घर भंडार परमये
आकाशवरण्या तिन्ही चांदण्या चवथी चांदणी झिरमये
ज्यानी घर कानबाई पावनी ते त्यानी घर काय काय परमये
ज्यानी घर कानबाई पावनी ते त्यानी घर खोबरं परमये
आकाशवरण्या तिन्ही चांदण्या चवथी चांदणी झिरमये
ज्यानी घर कानबाई पावनी ते त्यानी घर काय काय परमये
ज्यानी घर कानबाई पावनी ते त्यानी घर खारीक परमये

भगत :- हां हां हां हे धनी....

रामा :- (भक्ताचा धाम पुसतो व लिंबुच्या खापा भक्ताच्या अंगावरुन उतरवून लोकांमध्ये फेकतो) बोला.

भगत :- हे जावळ्या .

रामा :- मालक

भगत :- एक बात ऐसी है।

शामा :- मालक

भगत :- ये कलियुग है।

भिमा :- कलियुग नई महाराज हाई विज्ञान युग शे. रोबो माणूस तयार करा म्हणे कोणता तरी देसमा .

भगत :- आरे तेरी भला (रामा घाम पुसून खापा ओवाळून फेकतो.)

शामा :- महाराज पाणी कईन पडी ? जरा सांगा ते ?

भगत :- आरे तेरी भला ......देख मेरा जावळ्या !

रामा :- मालक.

भगत :- तुमने मेरे नामसे भंडारा दिया !

शामा :- नही महाराज !

भगत :- तुमने मेरा जय जय कार किया ?

शामा :- नही महाराज !

भगत :- फिर तुमने मुझे अंतर दिया. इसि वजहसे मैने तुम्हें अंतर दिया समझा !

रामा :- (घाम पुसत) हाई लोकेस्ले कयत नही महाराज .

भगत :- सच मेरा (मेरे) भाय ....सच बजाव (भगत नाचतो)

भिमा :- भोळा कन्हेर मोठा रंगेला
दारी हौश्याने बंगला बांधिला
तऱ्हे तऱ्हेचे रंग त्या बंगल्याला
भोळा कन्हेर मोठा रंगेला
दारी हौश्याने बगिचा लाविला
तऱ्हे तऱ्हचे फुल त्या बगिच्याला
भोळा कन्हेर मोठा रंगेला
दारी हौश्याने पिंजरा टांगिला
त्यात पोपट त्याने रोविला
नंद राजाने पिंजरा उघडिला

भगत :- हाँय.. हाँय.. हाँय .. सच ..सच मेरा भाय सच ... हे जावळ्या

रामा :- धनी तु..... (अंगावरुन लिंबु फेकतो ... घाम पुसतो)

भगत :- तुम सब आंध्या गायी है !

भिमा:- महाराज काई चुकाई गयं व्हई ते पदरमा ल्या... लेकरु मांडीवर हागस मंग काई मांडी कापीन फेकास का?

भगत:- आरे तेरी भला...ऽ
(तोच रामभाऊ घाबरत धावत, पळत येतो. भगतच्या पायावर डोके ठेवतो.)

रामभाऊ:- (घाबरत) माले प्रसन्न व्हा भगवान...

भगत:- (कुंचाने आशीर्वाद देत) हे वत्सा इतना घाबरा- घुबरा होने

का कोई काम नही !

रामभाऊ:- महाराज ! घरपावुत चला ! एवढं पूण पदरमा ल्या.

भगत:- हे जावळ्या !

रामभाऊ:- बोला भगवान !

भगत:- तेरा बच्चा बिमार है, मुझे समज गया ! तरीबी इतना घबरने का काम (नाही) नही... ले जा ये अंगारा... बच्चा कू लगादो और बच्चा जल्दी से जल्दी लेके आव..... ऐसा मे म्हैशासूर महाराज है। बजाव....

शामा :- म्हशा निंबुना खाणार
म्हशा निंबुना खाणार
म्हशा अंडाना खाणार
म्हशा अंडाना खाणार
म्हशा ढेपना खाणार
म्हशा ढेपना खाणार
म्हशा पाठना वाकडा
म्हशा पाठना वाकडा

भगत:-अंम-अंम-अंम-अंम-अंम
म्हशा डाबमा लोयनार म्हशा डाबमा लोयनार
(तोच रामभाऊ: मैना पोराला घेवुन )

भिमा :- ठयरो महाराज पोऱ्या इलागा .....

भगत :- बच्चा आ गया लेकीन मेरा भत्ता नही लाया

रामभाऊ :- भत्ता काय ऱ्हास महाराज !

भगत :- ४ बोटल शराब, दो काल्या मुरग्या, २१ लिंबु जाव जल्दी लाव .

रामभाऊ :- मैना, घरतीन हाई बठं वान लई ये, पोऱ्याले लय माफन
(मैना जाते)

भगत :- (कुंच्याने मुलाला फटकारतो) हां.... हां.... हां.... हां....हां....

शामा :- जरा चांगल दखा महाराज पोऱ्या नादान शे !

भगत :- हां हां काली काली महा काली झाड पहाड मे रहने वाली
(तिघी सेवकरी म्हणतात) दारु कोंबडा खानेवाली झाड पहाड मे
रहनेवाली काली काली महाकाली श्मशान मे रहनेवाली
साप इच्चू खानेवाली झाड पहाड मे रहनेवाली
भूत पलीत मारनेवाली वाघ सिंह मारनेवाली
(तेवढ्यात मैना दोन कोंबड्या दोन बाटल्या दारु घेवून येते.)

रामभाऊ :- ल्या महाराज कोंबड्या ! हाई दारु ! २१ लिंबु !

भगत :- (कोंबड्या धरुन) हां हां हां (कोंबड्या मुलावरुन उतरवितो)
हे महाकाली बंगालमे रहनेवाली .....
आदमी को जिंदा करनेवाली (दात ओठ खावून)
मुझे शराब और मुर्गी मिली ....(तोच पोरगा जोरात आई...ऽऽ
करुन ओरडतो व मरतो,तोच भगत सेवकरी सर्व पळून जातात.)

रामभाऊ :- (जोराने) भैय्या !

मैना :- (जोराने रडते) माय मन लेकरु ...मना सोनचिड्या व मनीमाय....
मना जिवना जिवडा व मनी माय व मनी माय ..मना राजाले कोठे
कोठे दखवू मनि माय....
(तेवढ्यात डॉ. मलेरीया येतो)

डॉक्टर :- काय झाले ?

रामभाऊ :- रडत दादा आमना पोऱ्याले भगत नी मारी टाका !

डॉक्टर :- अरेरे रामभाऊ ! तुमचे हे अज्ञान ...मुलगा आजारी होता. मग
तुम्ही डॉ. कडे न्यायला हवा होता. तुमच्या अज्ञानामुळे मुलगा
हातातून चालला गेला.

मैना :- खरं शेरे मना दादा. आमना भगतवर वजी इस्वासना दादा.

डॉक्टर :- याला कारण अज्ञान ! सुशिक्षीत लोक कधीही ढोंगी भक्तांकडे
आजारी मानसांना नेत नाहीत. म्हणून साक्षरतेचा दिवा घरोघरी
लावला पाहिजे.

रामभाऊ :- (संतापात) आज पाहिन हरामखोर ढोंगी भगतेस्न तोंड

दखावूज नही.

मैना :- आते तुमना डोया उघडनात - हेटली गलीना पुंडा मारत्तर सांगे पोऱ्याले दवाखानामा लई जा ! तुम्हीन तवय मनवर धर नही.

(तोच मथा माय सरला गंगा म्हातारी येतात. रडत)

मैना :- (रडते) माय मना भैय्या ले दखाले वन्यातव मनि माय !

म्हातारी :- (डॉक्टरांना) काय झायं ? डॉ. भाऊ

डॉक्टर :- भगताकडे मुलगा नेवून हातोहात गमावला आणि याला कारण अज्ञान ! म्हणून म्हणतो साक्षर व्हा ! सुजान व्हा !

म्हातारी :- मायवं आडाणी बाप डोकालें ताप .

डॉक्टर :- मग म्हणा तर ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा

साक्षर जनता भूषण भारता


अक्षर कळेल तरच संकट टळेल.

म्हातारी :- रामभाऊ म्हणाना ' अ आ ई '

सरला :- आजी म्हणाना ' अ आ ई '

मैना मावशी :- मथामाय म्हणाना ' अ आ ई '

रामभाऊ :- बाई व्हन म्हणाना ' अ आ ई '.



# थोडंसं मनमाथलं !

नांव मनं : प्रा. गवळी एल. जे.

गांव मनं : भाडणे, ता. साक्री जि. धुळे (महाराष्ट्र)

शिक्सन मनं : एम. ए.

सध्या : कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर हाई कालेजमा प्राध्यापक म्हणीन कार्यरत शे.

हाई दखा गड्यासवन !

माणूस वरी कोणं चांगलं व्हत व्हई ते जरुड करो. नईते चांगलं बी व्हत ना व्हई ते निदान वाईट तरी करो नई. माणूसनी दुसरानी बरोबरी जरुड करो. पण दुसरानी बरोबरी करता येत ना व्हई ते नदी माथला खेकडा बनीन त्यान्या तंगड्या तरी वढो नई.

आपली निती शाबूत झाई ते बठ्या गोष्टी बरोबर व्हतीस. म्हणीन दुसराना नसिबले आपलं नसिब घसो नई. दीनना साधू नि रातना चोर बनीन चोरी चहाडी करो नई. आशा कितल्याबी चोऱ्या चहाड्या कयात ते यामा भगवान रुजू राहात नई. म्हणीन कितल्याबी लाथा झटक्यात ते कधीच पुरे पडत नही. वाडावडीलस्नी म्हण करेल शे ती काई खोटी नई -

''नसिब करे जोर,<br>
ते कूंदा खने चोर''

आपलं नसिब जर जोर वर न्हायनं ते आपला वावरमाथला कूंदा चोर खनी लई जातंस आणि त्याच कुंदाना वावरमा आपले भसभस कमाया व्हतीस. म्हणीन गड्यासवन आपले देवनी माणूसना जलम देयेल शे माणूस नी मायक वागा आणि जगा.

कारण शेवट हाई दखा....

''माणूस बोलस गर्व अभिमान,<br>
आणि देव करी ते प्रमान.''

**हाई नाटक तुमले कसं वाटनं लेखकले अभिप्राय जरुर धाडा !**

**प्रा. एल. जे. गवळी**

मु. पो. भाडणे (माळीवाडा) ता. साक्री जि. धुळे फोन नं. ४०८६८